# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट क्र-१७२ दिनांक - ०२/०५/२०२४

## NCCRP portal वर दाखल तक्रारीमध्ये संबंधीतांना पाठपुरावा करुन तक्रारदार यांची फसवणुक झालेली रक्कम परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील सायबर पोलीस ठाणे येथे ऑनलाईन तक्रारीकरीता NCCRP portal कार्यरत आहे. सायबर पोलीस ठाणे मि.भा.व.वि पोलीस आयुक्तालयातील १८ पोलीस ठाण्यात NCCRP portal चे नोडल ऑफिसर म्हणुन कामकाज पाहते. खालील नमुद तक्रारदार यांनी त्यांची ऑनलाईन आर्थिक फसवणुक झाल्याबाबत ऑनलाईन तक्रार नोंदविली होती.

सायबर पोलीस ठाणे यांनी त्यांचे NCCRP portal तक्रारीचे अवलोकन करुन संबंधीत बँक/पेमेंट मर्चंट यांचेशी तात्काळ पुढील पत्रव्यवहार करुन तक्रारदार यांची रक्कम त्यांचे मुळ खात्यात जमा होणेबाबत पाठपुरावा केला. त्या अनुषंगाने सायबर पोलीस ठाणे यांचेकडुन **एकुण १,५३,१८०/- रक्कम ०३ तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आलेली आहे.**

१. NCCRP portal **तक्रारी अर्ज क्रमांक** २१९०४२४००३५८६० - श्री. अभिनव यांची परत केलेली **रक्कम** १,००,०००/-रु.
२. NCCRP portal **तक्रारी अर्ज क्रमांक** २१९०२२४०००९९५८ - श्री. तनिष यांची परत केलेली **रक्कम** ९३०/- रु.
३.NCCRP portal **तक्रारी अर्ज क्रमांक** २१९०४२४००२१४५० - श्री. अभिषेक यांची परत केलेली **रक्कम** ५२,२५०/- रु.

**फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **ऑनलाईन व्यवहार करीत असताना अगर इतर खात्यात रक्कम वर्ग करीत असताना बँक खात्याची खात्री केल्याशिवाय व्यवहार करु नये.**
- **बँक/क्रेडीट कार्ड बँक कोणत्याही प्रकारे ग्राहकांना एसएमएस किंवा फोनवर संपर्क साधून वैयक्तिक गोपनीय माहिती विचारणा करत नाही.**
- **अनोळखी मोबाईल धारकांना आपली वैयक्तिक माहिती/ आर्थिक व्यवहारासंबंधीत माहिती उघड करु नये. आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करू नये.**
- **अनोळखी लिंक, ॲप्लीकेशन डाऊनलोड करू नये.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० तसेच www.cybercrime.gov.in वर संपर्क करुन आपली तक्रार नोंदवावी.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउनि/प्रसाद शेनोळकर, मपोहवा/१२००७ माधुरी धिंडे, मपोअं/१३०८७ अमिना पठाण, मपोअं/१६१०६ सुवर्णा माळी,पोअं/राहुल बन,मपोअं/ स्नेहल पुणे, मपोअं/ चैताली सानप,पोअं/ शुभम कांबळे यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**
**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**